महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई - ४०० ००१.

**क्रमांक : व्यशिप्र-२०२२/आस्था-२/प्र.क्र.२३/पदभरती/का-४** **दि.०७-१२-२०२३**

## परिपत्रक क्र.१३७

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अधिपत्याखालील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत राज्यातील विविध शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील शिल्प निदेशक-१४५७ पदे भरण्याकरिता दिनांक १७/०८/२०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहिरात क्र.१/२०२२ च्या अनुषंगाने अर्ज केलेल्या उमेदवारांची सामायिक परीक्षा (CBT-१) दि.२८ व २९/०९/२०२२ रोजी घेण्यात आली होती. सामायिक परीक्षेत (CBT-१) किमान ४५% (५४ गुण) (Normalization-Mean Standard Deviation Method नुसार) प्राप्त करुन व्यावसायिक चाचणी (CBT-२) करिता पात्र ठरलेल्या उमेदवारांची दिनांक ०५/०६/२०२३ ते ११/०६/२०२३ व १३/०६/२०२३ रोजी व्यावसायिक चाचणी (CBT-२) घेण्यात आली होती. तद्नंतर सामायिक परीक्षा (CBT-१) व व्यावसायिक चाचणी (CBT-२) यामध्ये २०० गुणांपैकी किमान ४५% (९०) गुण प्राप्त केलेल्या उमेदवारांच्या प्रमाणपत्र/ कागदपत्र पडताळणीच्या (Document Verification) अधिन राहून तात्पुरत्या गुणवत्ता याद्या (Provisional Merit List) दिनांक ०६/१०/२०२३ रोजी व उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या माहितीच्या आधारे तात्पुरत्या निवड सूची (Provisional Selection List) प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

पहिल्या टप्प्यात तात्पुरत्या निवड सूचींमधील पदांच्या उमेदवारांची प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणी (Document Verification) खालील वेळापत्रकानुसार **व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई, द्वारा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुलुंड, नवीन इमारत, ३ रा मजला, बाळासाहेब ठाकूर वाडी, मिठागर रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई-८१** येथे करण्यात येणार आहे. तरी उमेदवारांनी सोबतच्या प्रपत्रात नमूद प्रमाणपत्र/कागदपत्रांच्या मूळ प्रती, साक्षांकीत झेरॉक्स प्रती (०३ संच) व Latest Passport size Colour Photo (०३ प्रती) सह वेळेवर उपस्थित रहावे.

| अ.क्र. | पदनाम | दिनांक | वेळ | उमेदवार |
|---|---|---|---|---|
| १ | शिल्प निदेशक (मेकॅनिक ॲग्रिकल्चरल मशिनरी) Craft Instructor (Mechanic Agricultural Machinery) | १८/१२/२०२३ | सकाळी ११.०० वाजता | निवड यादीतील अ.क्र.१ व २ वरील उमेदवार |
| २ | शिल्प निदेशक (यांत्रिक उपकरण केमिकल प्लांट) Craft Instructor (Instrument Mechanic Chemical Plant) | १८/१२/२०२३ | सकाळी ११.०० वाजता | निवड यादीतील अ.क्र.१ ते ४ वरील उमेदवार |
| ३ | शिल्प निदेशक (अटेंडन्ट ऑपरेटर केमिकल प्लांट) Craft Instructor (Attendant Operator Chemical Plant) | १८/१२/२०२३ | सकाळी ११.०० वाजता | निवड यादीतील अ.क्र.१ ते ४ वरील उमेदवार |
| ४ | शिल्प निदेशक (मेन्टेनन्स मेकॅनिक केमिकल प्लांट) Craft Instructor (Maintenance Mechanic Chemical Plant) | १८/१२/२०२३ | सकाळी ११.०० वाजता | निवड यादीतील अ.क्र.१ ते ५ वरील उमेदवार |
| ५ | शिल्प निदेशक (ऑपरेटर ॲडव्हान्स मशिन टूल्स) Craft Instructor (Operator Advance Machine Tools) | १८/१२/२०२३ | सकाळी ११.०० वाजता | निवड यादीतील अ.क्र.१ व २ वरील उमेदवार |

| अ.क्र. | पदनाम | दिनांक | वेळ | उमेदवार |
|---|---|---|---|---|
| ६ | शिल्प निदेशक (पंप ऑपरेटर कम मेकॅनिक) Craft Instructor (Pump Operator cum Mechanic) | १८/१२/२०२३ | सकाळी ११.०० वाजता | निवड यादीतील अ.क्र.१ ते १३ वरील उमेदवार |
| ७ | शिल्प निदेशक (प्लास्टिक प्रोसेसिंग ऑपरेटर) Craft Instructor (Plastic Processing Operator) | १८/१२/२०२३ | सकाळी ११.०० वाजता | निवड यादीतील अ.क्र.१ ते ५ वरील उमेदवार |
| ८ | शिल्प निदेशक (सर्वेक्षक) Craft Instructor (Surveyor) | १८/१२/२०२३ | सकाळी ११.०० वाजता | निवड यादीतील अ.क्र.१ ते ११ वरील उमेदवार |
| ९ | शिल्प निदेशक (टूल ॲण्ड डाय मेकर- डाईज ॲंड मोल्डस) Craft Instructor (Tool and Die Maker-Dies and Moulds) | १८/१२/२०२३ | सकाळी ११.०० वाजता | निवड यादीतील अ.क्र.१ ते ६ वरील उमेदवार |
| १० | शिल्प निदेशक (टूल ॲण्ड डाय मेकर- प्रेस टूल्स, जीग्ज ॲण्ड फिक्सचर्स) Craft Instructor (Tool and Die Maker-Press Tools, Jigs and Fixtures) | १८/१२/२०२३ | सकाळी ११.०० वाजता | निवड यादीतील अ.क्र.१ ते ८ वरील उमेदवार |
| ११ | शिल्प निदेशक (साचेकार) Craft Instructor (Foundryman) | १८/१२/२०२३ | सकाळी ११.०० वाजता | निवड यादीतील अ.क्र.१ ते ४ वरील उमेदवार |
| १२ | शिल्प निदेशक (विजविलेपक) Craft Instructor (Electroplater) | १८/१२/२०२३ | सकाळी ११.०० वाजता | निवड यादीतील अ.क्र.१ वरील उमेदवार |
| १३ | शिल्प निदेशक (मेसन-बिल्डींग कन्स्ट्रक्टर) Craft Instructor (Mason-Building Constructor) | १८/१२/२०२३ | सकाळी ११.०० वाजता | निवड यादीतील अ.क्र.१ ते १० वरील उमेदवार |
| १४ | शिल्प निदेशक (सुतारकाम) Craft Instructor (Carpenter) | १८/१२/२०२३ | सकाळी ११.०० वाजता | निवड यादीतील अ.क्र.१ ते १९ वरील उमेदवार |
| १५ | शिल्प निदेशक (आरेखक यांत्रिकी) Craft Instructor (Draughtsman Mechanical) | १८/१२/२०२३ | सकाळी ११.०० वाजता | निवड यादीतील अ.क्र.१ ते ७ वरील उमेदवार |
| १६ | शिल्प निदेशक (यांत्रिक उपकरण) Craft Instructor (Instrument Mechanic) | १८/१२/२०२३ | सकाळी ११.०० वाजता | निवड यादीतील अ.क्र.१ ते ६ वरील उमेदवार |
| १७ | शिल्प निदेशक (आर्किटेक्चरल ड्राफ्टस्मनशिप) Craft Instructor (Architectural Draughtsmanship) | १८/१२/२०२३ | सकाळी ११.०० वाजता | निवड यादीतील अ.क्र.१ वरील उमेदवार |
| १८ | शिल्प निदेशक (आर्किटेक्चरल ड्राफ्टस्मन) Craft Instructor (Architectural Draughtsman) | १८/१२/२०२३ | सकाळी ११.०० वाजता | निवड यादीतील अ.क्र.१ व २ वरील उमेदवार |
| १९ | शिल्प निदेशक (लघुटंकलेखन-मराठी) Craft Instructor (Stenography-Marathi) | १८/१२/२०२३ | सकाळी ११.०० वाजता | निवड यादीतील अ.क्र.१ वरील उमेदवार |
| २० | शिल्प निदेशक (डेस्क टॉप पब्लिशिंग ऑपरेटर) Craft Instructor (Desktop Publishing Operator) | १८/१२/२०२३ | सकाळी ११.०० वाजता | निवड यादीतील अ.क्र.१ व २ वरील उमेदवार |
| २१ | शिल्प निदेशक (सेक्रेटरियल प्रॅक्टिस-इंग्रजी) Craft Instructor (Secretarial Practice-English) | १८/१२/२०२३ | सकाळी ११.०० वाजता | निवड यादीतील अ.क्र.१ व २ वरील उमेदवार |
| २२ | शिल्प निदेशक (स्टेनोग्राफर सेक्रेटरियल असिस्टंट-इंग्रजी) Craft Instructor (Stenographer Secretarial Assistant-English) | १८/१२/२०२३ | सकाळी ११.०० वाजता | निवड यादीतील अ.क्र.१ ते ६ वरील उमेदवार |

**प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणी (Document Verification) करिता उमेदवाराने व्यक्तीश: स्वखर्चाने उपस्थित रहावयाचे आहे.** उमेदवाराऐवजी अन्य व्यक्तीस/नातेवाईकास प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणी (Document Verification) करिता उपस्थित राहता येणार नाही. प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणीकरिता उपस्थित राहिल्यानंतर उमेदवाराने संबंधित **मूळ प्रमाणपत्र/ कागदपत्र सादर करणे आवश्यक राहील.**

**प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणी (Document Verification) करिता बोलाविण्यात आले याचा अर्थ उमेदवाराची निवड झाली असा होत नाही.** प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणी (Document Verification) अंती पात्र ठरलेले उमेदवार पुढील भरती प्रक्रियेकरिता पात्र ठरतील.

उमेदवाराचे अनुभव प्रमाणपत्राची प्रथम प्रत्यक्ष तपासणी करण्यात येईल. तसेच जात/दिव्यांग/अनाथ/ नॉनक्रिमीलेयर इत्यादी प्रमाणपत्र/कागदपत्र सक्षम प्राधिकारी/आस्थापनांना तपासणीकरिता पाठविण्यात येतील. **उमेदवाराने सादर केलेले प्रमाणपत्र/कागदपत्र खोटे/बनावट असल्याचे आढळून आल्यास उमेदवारास सर्व पदांच्या पदभरतीच्या पुढील टप्प्याकरिता अपात्र ठरविण्यात येईल व उमेदवाराच्या नांवाचा समावेश काळ्या यादीत करण्यात येईल.** तसेच व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय व अधिनस्त शासकीय संस्था/कार्यालयातील पदभरतीकरिता कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल.

प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणीअंती पात्र ठरणाऱ्या उमेदवारांना पुढील भरती प्रक्रियेबाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल. प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणीअंती उमेदवार अपात्र ठरल्यास त्या प्रमाणात तात्पुरत्या **निवड यादीतील अतिरिक्त उमेदवारांची प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणी करण्यात येईल. याबाबतचे वेळापत्रक स्वतंत्रपणे जाहिर करण्यात येईल.**

प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणी (Document Verification) प्रक्रियेबाबत अंतिम निर्णय "संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४००००१." यांचा राहील.

उर्वरित शिल्प निदेशक पदांच्या तात्पुरत्या निवड सूची (Provisional Selection List) लवकरच प्रसिद्ध करण्यात येणार असून त्या पदांच्या उमेदवारांची प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणी (Document Verification) चे वेळापत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे जाहिर करण्यात येणार आहे. तात्पुरत्या निवड सूची (Provisional Selection List), प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणी (Document Verification) चे वेळापत्रक तसेच अनुषंगिक सूचना ह्या केवळ संचालनालयाच्या www.dvet.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार असल्याने उमेदवाराने वेळोवेळी संकेतस्थळावर पाहणे आवश्यक राहील.

तरी उमेदवारांनी याबाबतची नोंद घ्यावी.

DIGAMBAR AMBADAS DALVI

Digitally signed by DIGAMBAR AMBADAS DALVI
DN: CN = DIGAMBAR AMBADAS DALVI, C = IN, S = Maharashtra, O = DIRECTOR OF VOCATIONAL EDUCATION AND TRAINING MS, OU = DIRECTOR OF VOCATIONAL EDUCATION AND TRAINING
Reason: I am approving this document
Date: 2023.12.08 09:07:20 +05'30'

(दि. अं. दळवी)
संचालक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई-१.

# प्रपत्र

## प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणी (Document Verification) करिता आवश्यक प्रमाणपत्र/कागदपत्रांची यादी

| अ. क्र. | बाब | आवश्यक दस्तऐवज/कागदपत्रे | शेरा |
|---|---|---|---|
| १ | अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) | महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले अधिवास प्रमाणपत्र | सर्व उमेदवारांकरिता आवश्यक. |
| २ | वयाचा पुरावा | सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जन्म/ वयाचा दाखला/पुरावा | सर्व उमेदवारांकरिता आवश्यक. |
| ३ | शैक्षणिक अर्हता (Educational Qualification) | संबंधित पदासाठी जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हतेबाबतचे गुणपत्रक व/किंवा प्रमाणपत्र | सर्व उमेदवारांकरिता आवश्यक. |
| ४ | अनुभव प्रमाणपत्र | संबंधित पदासाठी जाहिरातीमध्ये नमूद केलेला अनुभव धारण करीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र. | सर्व उमेदवारांकरिता आवश्यक. अनुभव प्रमाणपत्राची सत्यता पडताळणी करण्याकरिता अनुभव प्रमाणपत्रासोबत सदर कालावधीत संबंधित आस्थापनेने दिलेल्या मासिक वेतनचिठ्ठ्या (Salary Slips)/ वेतनाबाबतच्या बँक पासबुकातील नोंदी/भविष्य निर्वाह निधी वर्गणीच्या नोंदी इत्यादी पुरावे उमेदवारास सादर करता येतील. |
| ५ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन | उमेदवाराची स्वाक्षरी असलेले सोबतच्या विहित नमुन्यातील प्रतिज्ञापन | सर्व उमेदवारांकरिता आवश्यक. |
| ६ | जात/जात वैधता प्रमाणपत्र | मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले जात प्रमाणपत्र | मागास प्रवर्गातील उमेदवारांकरिता आवश्यक. जात प्रमाणपत्रासोबत सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले जात वैधता प्रमाणपत्र असल्यास ते सादर करता येईल. |
| ७ | नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र | सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र | उमेदवार वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इ.माव. या प्रवर्गातील असल्यास तसेच खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास आवश्यक. |
| ८ | दिव्यांग प्रमाणपत्र | किमान ४०% दिव्यांगत्व असल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले प्रमाणपत्र | दिव्यांग उमेदवारांकरिता आवश्यक. |

| अ. क्र. | बाब | आवश्यक दस्तऐवज/कागदपत्रे | शेरा |
|---|---|---|---|
| ९ | अनाथ प्रमाणपत्र | सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले अनाथ प्रमाणपत्र | अनाथ उमेदवारांकरिता आवश्यक. |
| १० | खेळाडू प्रमाणपत्र | शासनाने घोषित केलेल्या खेळातील स्पर्धेत प्राविण्य प्राप्त केल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले प्रमाणपत्र | उमेदवार खेळाडू असल्यास आवश्यक. |
| ११ | माजी सैनिक | सैनिकी सेवेतून सेवानिवृत्त झाल्याबाबतचे दस्तऐवज/डिस्चार्ज कार्ड | उमेदवार माजी सैनिक असल्यास आवश्यक. |
| १२ | प्रकल्पग्रस्ताचा दाखला | सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेला प्रकल्पग्रस्ताचा दाखला | उमेदवार प्रकल्पग्रस्त असल्यास आवश्यक.<br>प्रकल्पग्रस्तांच्या दाखल्यात उमेदवाराच्या नांवाचा उल्लेख असणे आवश्यक. |
| १३ | भूकंपग्रस्ताचा दाखला | सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेला भूकंपग्रस्ताचा दाखला | उमेदवार भूकंपग्रस्त असल्यास आवश्यक. |
| १४ | पदवी/पदविकाधारक अंशकालीन उमेदवार | सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेंतर्गत शासकीय कार्यालयांमध्ये ३ वर्षे काम केल्याचे व याबाबतची नोंद जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये केल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले प्रमाणपत्र | उमेदवार पदवी/पदविकाधारक अंशकालीन उमेदवार असल्यास आवश्यक. |
| १५ | ना-हरकत प्रमाणपत्र | सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले ना-हरकत प्रमाणपत्र | केंद्र/राज्य शासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांना रुजू झाल्यानंतर मागील सेवेचा लाभ घ्याववयाचा असल्यास आवश्यक. |
| १६ | संगणक अर्हता प्रमाणपत्र | शासनाने विहित केलेली संगणक अर्हता धारण करीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र | उमेदवार शासनाने विहित केलेली संगणक अर्हता धारण करीत असल्यास |
| १७ | नांवात बदल झाल्या-बाबतचे प्रमाणपत्र | नांवात बदल केल्याबाबतचे अधिसूचित केलेले राजपत्र | विवाहित महिला उमेदवारांच्या बाबतीत विवाह नोंदणी प्रमाणपत्र/ लग्नानंतर नांवात बदल झाल्याबाबतचे अधिसूचीत राजपत्र. तसेच पुरुष/ महिला उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही कारणास्तव नांवात बदल झाला असल्यास नांवात बदल झाल्याबाबतचे अधिसूचीत राजपत्र. |
| १८ | ओळखपत्र | पासपोर्ट/पॅन कार्ड/आधार कार्ड/ मतदार ओळखपत्र/ड्रायव्हींग लायसन्स | सर्व उमेदवारांकरिता आवश्यक |

| अ. क्र. | बाब | आवश्यक दस्तऐवज/कागदपत्रे | शेरा |
|---|---|---|---|
| १९ | Grade/Credit System गुणपत्रक/ प्रमाणपत्र | सक्षम प्राधिकाऱ्याने निर्गमित केलेले श्रेणी पद्धतीबाबतचे पत्र/परिपत्रक | उमेदवाराच्या गुणपत्रक/प्रमाणपत्रावर Grade/Credit System Conversion Formula दर्शविलेला नसल्यास |

उपरोक्त प्रमाणपत्र/कागदपत्रांची यादी ही नमुन्यादाखल असून या व्यतिरिक्त उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या माहितीशी संबंधीत दस्तऐवज/कागदपत्र सोबत आणणे आवश्यक राहील. अधिक माहितीकरिता संचालनालयाची जाहिरात क्र.१/२०२२ तसेच संचालनालय स्तरावरुन वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात आलेल्या परिपत्रकातील तरतूदी उमेदवारांनी पहाव्यात.

*****

# महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम , २००५ मधील
## प्रतिज्ञापनाचा नमुना - अ
(नियम ४ पहा)

मी श्री / श्रीमती / कुमारी ..........................................................................................................

श्री ...................................................... यांचा / यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय ........ वर्षे,

राहणार ..................................................................................... याव्दारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

(१) मी ............................................................... या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला .................... (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या .............................................................. आहे. (असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा.)

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

सही/-

ठिकाण :-

दिनांक :-

**Declaration Form - A**

**(See Rule - 4)**

I, Shri.Smt/Kum…………………………………………………………………...

Son / Daughter / Wife of Shri, ……………………………………… age ………

Years, resident of ……………………………………………………………...

Do hereby declare as follows :-

1. That I have filled my application for the Post of ……………………..
2. I have ………………………..… (Number) Living children as on today. Out of which no. of children born after 2th March, 2005 is ……………………

   (Mention dates of birth, if any)

3. I am aware that if any total number of living children are more than two due to the children born after 28th March, 2006, I am liable to be disqualified for the same post.

Signature

Place :-

Date :-

महाराष्ट्र शासन

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई - ४०० ००१.

---

## एकापेक्षा जास्त पदांच्या तात्पुरत्या निवडसूचीत समावेश असलेल्या उमेदवारांचा पदांचा पसंतीक्रम

मी, श्री./श्रीमती ---------------------------------------------------------------------------
असे लिहून देतो की, माझ्या नांवाचा ---------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------------------------------
या पदांच्या तात्पुरत्या निवडसूचीत समावेश आहे.

प्रमाणपत्र/कागदपत्र पडताळणीअंती मी एकापेक्षा जास्त पदांकरिता पात्र ठरल्यास, माझा नियुक्ती करिता खालील प्रमाणे पदांचा पसंतीक्रम विचारात घेण्यात यावा.

१) ------------------------------------------------------------------------------------------

२) ------------------------------------------------------------------------------------------

३) ------------------------------------------------------------------------------------------

४) ------------------------------------------------------------------------------------------

५) ------------------------------------------------------------------------------------------

६) ------------------------------------------------------------------------------------------

७) ------------------------------------------------------------------------------------------

८) ------------------------------------------------------------------------------------------

यामध्ये मला कोणताही बदल करता येणार नाही, याची मला जाणीव आहे. याबाबत मी भविष्यात कोणतीही हरकत घेणार नाही.

उमेदवाराचे नांव व स्वाक्षरी

दिनांक :

ठिकाण :